# मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याबाबतच्या उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालावर करावयाची कार्यवाही.

# (Action to be taken report)

Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/N...

| अ.क्र | निष्कर्ष व शिफारसी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| (१) | प्रचलित कार्यपध्दती, यंत्रणा व प्रशासकीय संस्कृती , यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या समितीने केला आहे. सकृतदर्शनी दिसणा-या चुका वरील बाबींमुळे उद्‌भवतात का याचाही विचार समितीने केला आहे. एकंदरीत कार्यपध्दतीतल्या उणिवा काय आहेत हे शोधण्याकडे समितीने विशेष लक्ष दिले आहे. | उच्चस्तरीय चौकशी समितीने ज्या मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख केला आहे त्याचा शासन गांभिर्याने विचार करेल व त्यावर अंमलबजावणी करेल. |
| (२) | गुप्तचर अहवालांचे सर्वांगीण मुल्यमापन व योग्य विश्लेषण केले असते तर मुंबई शहरावर दहशतवाद्यांचा हल्ला करण्याचा कट शिजत आहे याची शक्यता समोर आली असती. सध्याची यंत्रणा अशा प्रकारचे सखोल मुल्यमापन करण्याच्या दृष्टीने अपुरी आहे.<br>केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून विशिष्ट असा दक्षतेचा इशारा मिळाला नसताना देखील, मुंबई/महाराष्ट्र पोलिसांनी उपलब्ध गुप्तवार्ता अहवाल गंभीरपणे घेतले नाहीत असा निष्कर्ष काढता येणार नाही. उदा. दक्षिण मुंबईतील ताजमहल हॉटेल, वर्ल्ड ट्रेड सेंटर, ओबेरॉय हॉटेल या सारख्या ठिकाणांवर संभाव्य बॉंब हल्ले होण्याची शक्यता असल्याच्या दक्षतेचा इशारा सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी दिनांक ०९.०८.२००८ रोजी दिला होता. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ व त्यांच्या कर्मचा-यांनी हा इशारा अतिशय गंभीरपणे घेतला. त्यांनी स्वतः सर्व ठिकाणांना दिनांक ११.०८.२००८ रोजी भेट दिली. आणि दि. १२.०८.२००८ रोजी सुरक्षा उपाययोजनांबाबत लेखीसूचनाही दिल्या होत्या. मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी, ओबेरॉय हॉटेलचे सुरक्षा व्यवस्थापक यांना सुरक्षा उपाययोजनांच्या संबंधात लेखी सूचना दिल्या होत्या आणि आपल्या कार्यक्षेत्रातील विविध हॉटेल्स्, मॉल्स्, मल्टिप्लेक्सेस् यांच्या प्रतिनिधींना सुरक्षाविषयक माहिती देखील दिलेली होती.<br>ताजमहाल पॅलेस हॉटेल इत्यादीसारख्या विशिष्ट लक्ष्यांवर लष्कर-ए-तोयबाचा 'डोळा' होता असा गुप्तवार्ता केंद्राचा इशारा दि.२४.९.२००८ रोजी मिळाल्यावर, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी, दि.२९.९.२००८ रोजी ताजमधील सुरक्षा अधिका-यांबरोबर आणखी एक बैठक घेतली होती, त्यावेळी | दि.२९/११/०८ रोजीच्या एका अति महत्वाच्या व्यक्तीच्या हॉटेल ट्रायडंट येथील नियोजित भेटीसंबंधी केंद्रीय गुप्तचर विभाग आणि एस.पी.जी. यांच्यासोबत दि.२६/११/२००८ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत बैठक चालू होती. त्यात श्री.विनय कारगावकर, अपर पोलीस आयुक्त (सुरक्षा) हे देखील सहभागी होते. दहशतवादी हल्ल्यांच्या संबंधी केंद्रिय यंत्रणांना निश्चित कालावधी बाबतीत अंदाज नव्हता असे दिसून येते.<br>२६/११ नंतर गृह विभागाने, अपर मुख्य सचिव (गृह), पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त आणि आयुक्त (गुप्तवार्ता) यांच्यासह मुंबईमधील भारत सरकारच्या अन्य गुप्तवार्ता शाखांची साप्ताहिक गुप्तवार्ताविषयक बैठक मा.मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यास सुरुवात केली आहे.<br>हा गट कार्यान्वित केल्यामुळे गुप्तवार्ता इशाऱ्यांची छाननी आणि करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्याच्या दृष्टीने योग्यप्रकारे विश्लेषण करण्यात येत आहे..<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |

| | | |
|---|---|---|
| | हॉटेलचे महाव्यवस्थापक, श्री.करम बीर कांग हेदेखील उपस्थित होते. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी, सुरक्षा अधिकाऱ्यांना व्यक्तिशः माहिती देण्यासाठी दि.३०.९.२००८ रोजी ताज हॉटेलला पुन्हा भेट दिली. | |
| (३) | या संदर्भात, ताज व ओबेरॉय यांच्या व्यवस्थापनांनी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी दिलेल्या सुरक्षेबाबतच्या महत्वपूर्ण सल्ल्यानुसार आवश्यक ती अंमलबजावणी केली नव्हती असे मत व्यक्त करणे समितीला भाग आहे. हा इशारा लक्षात घेऊन ताज किंवा इतर हॉटेल्सनी पोलीस सुरक्षा वाढवण्यासाठी कोणतीही विनंती केलेली नव्हती याची समितीने नोंद घेतली आहे. | ताज आणि ट्रायडंट यासारख्या आस्थापनांची सुरक्षा ऑडिट करण्यात आली असून, सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये अभ्यागत व त्यांचे सामान यांचे परिक्षण (Screening) करणे, खोल्यांकडे जाणा-या मार्गाचे संनियंत्रण करणे व इतर उपाययोजना यांचा समावेश आहे. खाजगी संस्था आणि आस्थापना यांच्यासाठी सुनियोजित अंमलबजावणी व संनियंत्रण कार्यक्रम राबविण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. |
| (४) | सद्यःपरिस्थितीत पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाकडून किंवा दहशतवादविरोधी पथकाकडून किंवा गृह विभागाकडून गुप्तवार्तावर आधारित इशा-यांचे संदेश क्षेत्रीय अधिका-यांना यांत्रिकपणे पाठविले जातात असे समितीला आढळून आले आहे. राज्य शासनाच्या स्तरावर अशा गुप्तवार्तावर आधारित इशाऱ्यांच्या हाताळणीत गोंधळाचे वातावरण समितीच्या निदर्शनास आले आहे.<br>हे लक्षात घेता, समिती अशी शिफारस करीत आहे की, प्रधान सचिव (गृह) (कायदा व सुव्यवस्था) यांना, असे अहवाल प्राप्त करून त्यावर कार्यवाही करण्यासाठी, नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात यावे. या इशा-यांपैकी गंभीर व कारवाई योग्य , गुप्तवार्तासंबंधी अपर मुख्य सचिव (गृह) यांना संपूर्ण माहिती दिली जावी. व गृह विभागाच्या संबंधितांना अशा सर्व कामांची अंतिम जबाबदारी त्यांनी घ्यावी. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदीनुसार कायदेशीर जबाबदारी त्यांचेवरही आहे. गृहमंत्री तसेच मुख्य सचिव यांना याबाबतीतील | २६/११ नंतर, गुप्तवार्ता इशा-यांवर कार्यवाही करण्याच्या पध्दतीत गृह विभागाने पूर्णपणे बदल केला आहे.<br>मंत्रालयात, प्रधान सचिव, गृह विभाग (कायदा व सुव्यवस्था) यांना गुप्तवार्ताविषयक सर्व अहवाल प्राप्त करुन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून निर्देशित करण्यात आले आहे. महासंचालकांच्या स्तरावर, गुप्तवार्ता आयुक्त हे राज्यातील गुप्तवार्ता यंत्रणा आणि भारत सरकारच्या अभिकरणाशी संबंधात, नोडल अधिकारी म्हणून कामकाज पाहतात. भारत सरकारकडून प्राप्त गुप्तवार्ता थेट महासंचालक किवा मुख्य सचिव यांच्याकडे पाठवली जातात. विभागाने केलेले विश्लेषण आणि निर्धारण यांच्या छाननीसाठी साप्ताहिक बैठका घेतल्या जातील. आयुक्तालये आणि जिल्ह्यामध्ये लहान कृति-गट स्थापन करण्याबाबत सूचना दिल्या जातील.<br>मुंबई शहरामध्ये, सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) हे या |



Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

| | | |
|---|---|---|
| (४) | संपूर्ण माहिती देण्याची जबाबदारीही अपर मुख्य सचिव (गृह) यांची असेल.<br>आयुक्त, राज्य गुप्तचर विभाग यांच्याकडे गुप्तचर विभागाचा संपूर्ण प्रभार असल्यामुळे त्यांनी स्वतःच याचे नोडल अधिकारी म्हणून काम पहावे.<br>सर्व गुप्तवार्ता अहवाल आयुक्त, राज्य गुप्तचर विभाग यांच्याकडे पाठविण्यात यावेत आणि पोलीस महासंचालक / पोलीस आयुक्त यांच्यासह सर्व संबंधितांना सतर्क करणे ही त्यांची जबाबदारी असेल. पोलीस महासंचालक यांनी नोडल अधिकाऱ्यासंबंधी केंद्र शासनाच्या यंत्रणांना अवगत करावे. तसेच, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग ह्यांनी स्थानिक केंद्रीय यंत्रणा, नौदल, तटरक्षक दलासह लष्करी यंत्रणा यांच्या संपर्कात रहावे. मुंबई विशेष शाखा, दहशतवाद विरोधी पथक आणि इतर सर्व संबंधितांबरोबर वेळोवेळी बैठका घ्याव्यात.<br>आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग किंवा केंद्रीय यंत्रणांकडून गुप्तवार्ता मिळाल्यानंतर कारवाईच्या सूचना देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा एक लहान गट स्थापण्यात यावा अशी आम्ही शिफारस करतो. सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांच्या नेतृत्त्वाखाली या गटात अपर आयुक्त (दहशतवादविरोधी पथक), अपर आयुक्त (विशेष शाखा), अपर आयुक्त (संरक्षण) आणि अपर आयुक्त (गुन्हे शाखा) यांचा समावेश असावा. आवश्यकतेनुसार संबंधित विभागीय अपर पोलीस आयुक्त यांना देखील या गटाने आमंत्रित करावे. पूर्वीचे दक्षतेचे इशारे अवनत करावे किंवा कसे याबाबतचा निर्णयदेखील या गटाने घ्यावा. पोलीस महासंचालक यांनी उर्वरित राज्यासाठी , विशेषतः ज्या शहरांसाठी पोलीस आयुक्त नेमलेले आहेत अशाच प्रकारच्या लहान गटांची स्थापना करावी. या गटांनी आयुक्त, राज्य गुप्तचर विभाग यांच्याशी दहशतवादी हल्ल्यासंबंधी सूचनांबाबत संपर्क ठेवावा. | गटाचे नेतृत्व करतील आणि त्या गटात अपर पोलीस आयुक्त (दहशतविरोधी पथक), अपर पोलीस आयुक्त (विशेष शाखा), अपर पोलीस आयुक्त (संरक्षण) व अपर पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांचा समावेश असेल. संबंधित प्रादेशिक अपर पोलीस आयुक्त यांना आवश्यकतेनुसार बोलावण्यात येईल. पूर्वी प्रसारीत केलेल्या गुप्तवार्ता इशा-यांचे महत्व अवनत करणे किंवा असे इशारे काढून घेणेही, या गटाची जबाबदारी असेल.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |
| (५) | २६/११ सारख्या दहशतवादी हल्ल्यांचा तसेच बॉंब हल्ल्यांचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने मुंबई पोलीस आयुक्तांकडे शीघ्र प्रतिसाद पथक उपलब्ध असणे आवश्यक आहे. हे पथक सर्वोत्कृष्ट अशा साधनसामग्रीने सुसज्ज | मुंबई शहराव्यतिरिक्त संभाव्य लक्ष्य ठरु शकणा-या अन्य शहरांसाठी शासन, शीघ्र प्रतिसाद पथक स्थापन करील. सदर पथकाकडे अत्याधुनिक शस्त्र व सामुग्री असेल. अशा शीघ्र प्रतिसाद पथकाचे |

असावे. अशा शीघ्र प्रतिसाद पथकाचे आणखी प्रभावशाली व कार्यक्षम दलामध्ये कसे रुपांतर करता येईल याविषयी समितीने पुढील परिच्छेदात सूचना केल्या आहेत.

मुंबई पोलीसांच्या सध्याच्या शीघ्र प्रतिसाद पथकाचे (क्यूआरटी) शस्त्रसज्ज अशा कमांडो दलामध्ये रूपांतर करण्याची व कमीत कमी वेळात शहराच्या कोणत्याही भागात पोहचण्याची क्षमता असलेल्या दलामध्ये परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, या पथकांना ॲसॉल्ट मोबाईल असे नाव दिले असले तरी त्यांचे सध्याचे स्वरुप सशस्त्र पोलीस पथके एवढेच मर्यादित आहे. अशा पथकाचा उपयोग स्थानिक स्तरावरील टोळीयुध्दासारखी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळू शकेल किंवा अचानक उद्‌भवणारी हिंसक परिस्थिती हाताळू शकेल. मात्र, दि.२६.११ रोजी सारख्या प्रत्यक्ष दहशतवादी हल्ल्यांचा प्रभावीपणे सामना करणे अशा पथकांच्या शक्तीबाहेर आहे असे समितीस वाटते. समितीने बॉम्बस्फोट / दहशतवादी हल्ला हाताळण्याबाबत सध्याच्या कार्यचालन पध्दतीचा अभ्यास केला आहे. या कार्यपध्दतीनुसार सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) हे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे प्रमुख असतील व सर्व नियंत्रण कक्षांचे प्रभारी असतील. सह पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) हे सह पोलीस आयुक्त (दहशतवादविरोधी पथक) यांच्या संपर्कात राहून काम करतील, असे देखील या पध्दतीमध्ये विहित केलेले आहे. दि.२६.११.२००८ रोजी या सुचनांचे पालन केले गेले नाही. त्याऐवजी पोलीस आयुक्तांनी सह पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांना नियंत्रण कक्षाचा प्रभारी म्हणून परिस्थिती हाताळण्यास सांगितले. कार्यचालन पध्दतीचा विचार केला असता सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) हे विविध ठिकांणावर पोलीस दल तैनात करण्यासंबंधी निर्णय घेण्यास योग्य ठरले असते.

असे असले तरीही श्री.राकेश मारीया, सह पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी ही अत्यंत गंभीर परिस्थिती हाताळताना सुयोग्य कामगिरी पार

आधुनिक कमांडो दलामध्ये रुपांतर करण्यात येईल.

कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न हाताळण्यासाठी आक्रमणविरोधी पथकांचा, सशस्त्र पोलीस युनिटे म्हणून उपयोग करुन घेतला जाईल.

प्रमाणित कार्यचालन पध्दतीनुसार सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) हे आपत्ती व्यवस्थापनचे प्रमुख असतील आणि ते विभागीय नियंत्रण कक्ष, मुख्य नियंत्रण कक्ष, पोलीस ठाण्याचा कर्मचारीवर्ग, परिमंडलीय पोलीस उपायुक्त आणि विभागीय अपर पोलीस आयुक्त यांना नेमून दिलेल्या कामावर देखरेख ठेवतील.

दिनांक २६/११ रोजी सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) हे, पोलीस महासंचालकांनी त्यांना दुसरीकडे जायला सांगेपर्यंत, प्रमाणित कार्यचालन पध्दतीनुसार मुख्य नियंत्रण कक्षात थांबून युनिट्स तैनात करण्याच्या कामावर देखरेख ठेवीत होते.

प्रमाणित कार्यचालन पध्दती नुसार पोलीस उपायुक्त (कार्यचालन) यांनी नियंत्रण कक्ष अधिकारी म्हणून काम पहावयाचे आहे. २६/११ रोजी व नंतर पोलीस उपायुक्त (कार्यचालन) हे नियंत्रण कक्षात होते.

परंतु त्यावेळची परिस्थिती अत्यंत आणीबाणीची होती हे लवकरच स्पष्ट झाले. ती तातडीने हाताळण्यासाठी क्षेत्र युनिटांच्या प्रमुखपदी असलेल्या अधिका-यांना कार्यचालनात मार्गदर्शन करण्यासाठी आणि प्रत्यक्ष कार्य करीत असलेल्या वरिष्ठ महानिरीक्षकाच्या दर्जाच्या अधिका-यांना सूचना देण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ अधिका-यांची गरज होती. पोलीस उपायुक्त (कार्यचालन) यांनी अगोदरच नियंत्रण कक्ष अधिकारी म्हणून प्रभार घेतला होता,परंतू घटनेची भीषणता जेव्हा स्पष्ट झाली तेव्हा मुख्य नियंत्रण कक्षामधील नेतृत्व अधिक बळकट करण्याची गरज भासली आणि त्यामुळे पोलीस आयुक्तांनी, सह पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.राकेश मारिया यांना पोलीस उपायुक्तांच्या कार्यात मार्गदर्शन/सहाय्य करण्यास सांगितले.



Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

| | | |
|---|---|---|
| | पाडल्याची समितीने नोंद घेतली आहे. नियंत्रण कक्षातील सर्व अधिकारी / कर्मचारी बिनतारी यंत्रणा चालक तसेच अभिलेख ठेवण्यासंबंधी स्त्युत्य अशी कामगिरी केलेली आहे.<br>पूर्व अनुभवानुसार आणि काळजीपूर्वकरित्या निश्चित केलेल्या प्रमाणित कार्यचालन पध्दतीकडे अशा आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी दुर्लक्ष करणे योग्य नाही असे मत नोंदविणे समितीस भाग पडत आहे. पोलीस आयुक्त किंवा पोलीस महासंचालक यांच्यासारख्या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी, प्रमाणित कार्यचालन पध्दतीकडे योग्य ते लक्ष न देण्याचे ठरविले तर अशा कार्यचालन पध्दती ठेवाव्यात तरी कशाला? आम्हाला असे समजले आहे की, पोलीस आयुक्तांनी यासंबंधी कोणताही अहवाल देण्याचे दहशतवादविरोधी पथकास सूचित देखील केले नाही. २६/११ सारख्या गंभीर हल्ल्यानंतर खात्यांतर्गत घडलेल्या घटनेसंबंधी विस्तृत चर्चा करणे व सविस्तर विश्लेषण करणे आवश्यक होते. त्यामुळे सांघिक भावना जोमाने वाढीस लागली असती आणि संपूर्ण रचनेमध्ये योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक होते. | प्रमाणित कार्यचालन पध्दती अनसुरली नाही असे म्हणणे उचित होणार नाही. परंतू त्याचबरोबर हेही खरे आहे की, नियंत्रण कक्षाच्या अधिका-यांचे बळ वाढवण्याचा किंवा आपत्तीचा सामना करतांना स[illegible] पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांना दुसऱ्या कामासाठी घेण्या[illegible] निर्णय घेणे आवश्यक होते. आणि तसा निर्णय पोलीस आयुक्त आणि पोलीस महासंचालक ह्यांच्या नेतृत्वाने घेतला.<br>प्रमाणित कार्यचालन पध्दतीमध्ये घटनेनंतर अधिका-यांकडून अहवाल घेणे व चर्चा करणे ही अनिवार्य बाब म्हणून नमूद केलेली नाही. असे करण्यासाठी लागणारी कालमर्यादा व कार्यपध्दती, तसेच पुन्हा अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारी प्राधिकाराची पातळी याचा समावेश प्रमाणित कार्यचालन पध्दतीमध्ये नाही, हा दोष शासन दूर करील. |
| (६) | प्रसारमाध्यमे मुंबईमधील वेगवेगळया ठिकाणांहून बातम्या देत असताना, पोलिसांकडून किंवा मंत्रालयातून त्यांना पध्दतशीर माहिती पुरवण्यासाठी कोणतीच यंत्रणा नव्हती. वेगवेगळया ठिकाणी घडणाऱ्या घटनांबाबत अधिक सविस्तर माहिती केवळ नियंत्रण कक्षाकडेच होती. वास्तविक आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख किंवा पोलीस मुख्यालयातील पदनिर्देशित अधिकृत प्रवक्ता यांनी ही कामगिरी पार पाडावयास हवी होती.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | मुख्य सचिवांनी, मंत्रालयातील त्यांच्या दालनातच अधिकाऱ्यांच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापन केंद्र उघडले होते. तेथे २६/११ च्या रात्री १०.०० पासून प्रसारमाध्यमांना चालू घटनांबाबत नियमीतपणे अवगत करुन दिले जात होते. माहिती व जनसंपर्क विभागाच्या महासंचालक श्रीमती मनीषा म्हैसकर या प्रशिक्षणासाठी गेलेल्या असल्यामुळे ,मुख्य सचिवांनी माहिती व जनसंपर्क विभागाचे भूतपूर्व महासंचालक श्री.भूषण गगराणी यांची शासकीस प्रवक्ते म्हणून तात्काळ नियुक्ती केली. श्री.गगराणी यांनी मध्यरात्रीपर्यंत मंत्रालयात व पुन्हा पहाटे ४ च्या सुमारास मुख्यमंत्र्यांबरोबर प्रसारमाध्यमांना माहिती देण्यासाठी मंत्रालयात बैठका घेतल्या. त्याचप्रमाणे श्री.गगराणी हे मंत्रालय व रुग्णालये अशा दोन्ही ठिकाणी, प्रसारमाध्यामांना माहिती देते होते. लष्करी कमांडो आणि |

| | | |
|---|---|---|
| | | राष्ट्रीय सुरक्षा रक्षक हेही प्रत्यक्ष कार्यचालनाबाबत प्रसारमाध्यमांना नियमीतपणे माहिती देत होते. आयुक्तांचे कार्यालय आणि महासंचालकांचे कार्यालय यामधील प्रवक्त्यांकडून नियमीतपणे माहिती देणारी यंत्रणा कार्यरत ठेवण्याबाबत सूचना देण्यात येतील. |
| (७) | भारत सरकारने, नौदलाला त्यांच्या नियंत्रणाखालील तटीय व किनारी या दोन्ही सुरक्षांसह संपूर्ण सागरी सुरक्षेसाठी जबाबदार म्हणून अधिसूचित केले आहे. तथापि, राज्य किनारी पोलिसांची निश्चित जबाबदारी अद्याप स्पष्ट झालेली नाही. समितीला असे वाटते की, तटीय सुरक्षेची जबाबदारी आपल्या अधिकारितेत घेणे ही मुंबई शहर पोलिस व महाराष्ट्र राज्य पोलिसांसाठी अशक्यप्राय गोष्ट असेल.<br>सध्याची व्यवस्था ही दिखाऊ स्वरूपाची असल्याचे समितीचे मत आहे. हा अभिप्राय, त्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी केलेल्या मूल्यमापनाच्या आधारे देण्यात आला आहे. हा प्रश्न प्रशासनाने प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून सोडवला पाहिजे.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | संरक्षण मंत्रालयाने, संपूर्ण सागरी सुरक्षेसाठी नौदल तसेच तटरक्षकांची नियुक्ती केली आहे. तथापि, अधिकारितेचे नेमके क्षेत्र व त्यांच्या जबाबदारीचे नेमके स्वरुप निश्चित करण्यात आलेले नाही. तसेच किनाऱ्यालगतचा प्रदेश व समुद्र यातील सुरक्षा व्यवस्थेमध्ये फरक करणे नेहमीच शक्य नसते.<br>तटीय क्षेत्रांमध्ये पोलीस यंत्रणाचे बळकटीकरण करण्यासाठी व महाराष्ट्राच्या तटीय मार्गात येणा-या व जाणा-या जहाजांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यासाठी गृह विभागानेही मत्स्यव्यवसाय विभागाशी विचारविनिमय करुन विशिष्ट पाऊले उचलली आहेत.<br>अलीकडेच २६.११.२००८ नंतर संरक्षण मंत्रालयाने नौदल व तटरक्षकाची सागरी किना-यापर्यंत संरक्षणाची जबाबदारी घेतली असून त्याची तटीय सुरक्षा व्यवथेची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. राज्य सरकारने देखील अलीकडेच अतिवेगवान बोटी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. एकूण ४६ बोटी भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत.४०० पोलीस जवानांना २० तुकड्यांमध्ये प्रशिक्षण दिले असून, १२ तटीय सुरक्षा पोलीस स्थानके सुरु करण्यात आली आहेत. २४ पोलीस चौक्या स्थापन केल्या असून आवश्यकतेनुसार योग्य त्या ठिकाणी ७ अतिरिक्त चौक्या उभारण्यात येतील. गोवा शिपयार्ड कंपनीकडून गस्त घालण्यासाठी २ नौका देखील प्राप्त झाल्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| (८) | रुपये २५ लाखांवरील सर्व खरेदीसाठी गृहमंत्र्यांची मान्यता घ्यावी अशा तत्कालीन उप मुख्यमंत्री यांच्या, आदेशामुळे (शासन निर्णय क्रमांक पीईक्यू ०१२०००/पीसी/सीआर-१५/पोलीस-४, दिनांक २९ मे, २०००) मोठी अडचण निर्माण झाली आहे. या मर्यादेमध्ये भरीव वाढ करण्याचा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीकडे ही जबाबदारी सोपवण्याचा विचार करावा. | पोलीस दलासाठी खरेदी ही २ प्रकारांमध्ये मोडते. पहिल्या प्रकारची खरेदी ही महासंचालक, पुरवठा व विल्हेवाट यांच्या दर कंराराखाली किंवा ऑर्डिनन्स फॅक्टरीकडून केली जाते.अशा प्रकारच्या खरेदीचे अधिकार पोलीस आयुक्त / पोलीस महासंचालकांना पूर्वीपासूनच विकेंद्रीत करण्यात आले आहेत. मात्र दूस-या प्रवर्गामधील खरेदी ही जाहीर निविदा पध्दतीद्वारे केली जाते. पोलिस आधुनिकीकरणासंबंधी बाबींना रुपये २५ लाखांच्या वरील खरेदीसाठी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. शासनाकडे आलेल्या सर्व प्रस्तावांना वित्तीय वर्ष संपण्यापूर्वीच मंजूरी दिली जाते, हे खालील तक्त्यावरुन दिसून येईल.आवश्यक असलेली रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास परवानगी देण्याचे आदेशही आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी निर्गमित केलेले आहे..<br><br>मागील काही वर्षामधील आकडेवारी पुढील तक्त्यावरुन दिसून येईल :- |

| वर्ष | रुपये २५ लाखापेक्षा जास्त रकमेसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव | प्रस्तावाचे मुल्य (रु.कोटीत) | अशा प्रस्तावाची आधुनिकीकरण अंदाजपत्रकाशी असलेली टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००४-०५ | ४ | २० | ७.४७ |
| २००५-०६ | १७ | २४ | १२.९८ |
| २००६-०७ | १५ | १६ | ११.२२ |
| २००७-०८ | १२ | १० | ६.२३ |
| २००८-०९ | २६ | ४९ | ३४.५ |

Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

| वर्ष | रुपये २५ लाखापेक्षा जास्त रकमेसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव | विभागाला प्रस्ताव प्राप्त झालेला कालावधी | विभागाने मान्यता दिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| २००४-०५ | ४ | २२.१.०४ ते २४.१२.०४ | ३१.७.०४ ते २४.३.०५ |
| २००५-०६ | १७ | ३०.१२.०५ ते ३०.३.०६ | २.२.०५ ते ३१.३.०६ |
| २००६-०७ | १५ | ४.१२.०६ ते ३०.३.०७ | ७.१२.०६ ते ३०.३.०७ |
| २००७-०८ | १२ | ३.१२.०७ ते ३१.३.०८ | १५.१.०८ ते ३१.३.०८ |
| २००८-०९ | २६ | १९.६.०८ ते २०.३.०९ | २०.२.०९ ते ३१.३.०९ |

यातक्त्यावरुन सदर शासन निर्णयामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रीयेत अडचण निर्माण झालेली नाही हे स्पष्ट होते.

| | | |
|---|---|---|
| (९) | खरेदीची कार्यपध्दती सोपी करणे आणि अधिकार खालच्या स्तरावर सोपवणे आवश्यक आहे. कागदोपत्री विलंब लावण्याऐवजी सर्व प्रलंबित प्रस्ताव निकालात काढण्यासाठी शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी आम्ही शिफारस करीत आहोत. | वर्षभरातील खरेदीचे वेळापत्रक वेळीच आखून पोलीस सामग्री खरेदीच्या धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी गृह विभागाने यापूर्वी शासन निर्णय क्र एमआयएस ०४०९/५९२/सीआर २७०/पीओएल ४ दिनांक २० मे २००९ निर्गमित केला आहे. तसेच सर्व प्रकारची खरेदी करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या नियंत्रणाखाली शक्ती प्रदान समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये वित्त विभाग, गृह विभाग, उद्योग विभाग यांचे प्रतिनिधी व उद्योग आयुक्त यांचा समावेश आहे. यामध्ये संपूर्ण राज्याकरीता एकत्रित पध्दतीने खरेदीची तरतूदही केली आहे. |

Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

| | | |
|---|---|---|
| (१०) | महाराष्ट्र पोलिसांसाठी शस्त्रे व दारुगोळा यांची उपलब्धता ही एक समस्या आहे. पोलीस महासंचालक श्री. ए. एन. रॉय यांच्यानुसार शीघ्र प्रतिसाद पथकाला दर चौथ्या दिवशी गोळीबाराचा सराव करावयाचा असतो. दारुगोळयाचा तुटवडा असल्याने सप्टेंबर, २००७ पासून त्या पथकाला असा सराव करता आला नाही हे याआधीच नमूद करण्यात आले आहे.<br>निधीची कमतरता असल्यामुळे महाराष्ट्र पोलिसांकडे शस्त्रे व दारुगोळा यांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. तथापि, गृह विभागाने, दिनांक ६.४.२००९ रोजी समितीला असे कळविले की, उक्त प्रस्तावात आणि दिनांक ७.६.२००८ रोजी सादर केलेल्या नंतरच्या प्रस्तावात तफावत दिसून आल्याने पोलीस महासंचालकांनी दिनांक २०.१२.२००७ रोजी सादर करण्यात आलेल्या शस्त्रास्त्र धोरणाच्या मसुद्यास मान्यता दिलेली नाही. तथापि, शासनाने, दिनांक ३०.०६.२००८ रोजी सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली. समितीला असे वाटते की, याबाबत पत्रव्यवहार वाढविण्यापेक्षा हा प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज आहे.<br>पोलीस महासंचालक यांच्याकडून समितीला असे कळविण्यात आले की, प्रत्येक वर्षी प्रत्येक पोलिसाला ४० फैरी झाडणे अनिवार्य असते. या प्रमाणात महाराष्ट्र पोलीसांना दारुगोळयाची गरज असते. परंतु गेल्या पाच वर्षात तेवढा । दारुगोळा उपलब्ध झाला नाही. उपलब्ध दारुगोळयाचे नक्षलग्रस्त क्षेत्रे, विशेष कमांडो, इत्यादींना अग्रक्रमाने वाटप करणे आवश्यक आहे.<br>पोलीस महासंचालक यांनी असे सांगितले की, दारुगोळयाच्या कमतरतेमुळे गोळीबाराचा सराव न केल्याने पोलिसांची आक्रमण क्षमतेवर गंभीर परिणाम झ ाला आहे. उदाहरणार्थ, एके-४७ बंदुकीच्या गोळयांचा शेवटचा पुरवठा २००५ मध्ये झाला आणि तो ४५,००० इतका होता. डिसेंबर, २००६ नंतर कोणताही दारुगोळा मिळाला नाही. अशा रीतीने या समस्येवर त्वरित निर्णय घ्यावा अशी समितीची विनंती आहे.<br>समिती अशी शिफारस करते की, या निर्णयांच्या अंमलबजावणीवर | जोडपत्र १ वरुन असे दिसून येईल की, बहुतांश बाबी ह्या योजनेत्तर बाबी असून या बाबींची नित्यस्वरुपात यापूर्वीच खरेदी केली जात होती. या सर्व बाबींची डी.जी.एस.ॲन्ड डी. यांच्या दर कंत्राटानुसार खरेदी केली जात असून त्यांच्या खरेदीसाठी शासनाकडे कोणताही निर्देश मागण्याची गरज नाही.<br>अपर मुख्य सचिव गृह यांनी दिलेली आकडेवारी ,पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, पोलीस महासंचालकांकडे दारुगोळा उपलब्ध होता व प्रत्येक वर्षी होणारा पुरवठा त्यांना नियमीतपणे मिळत होता. एके-४७ साठी २००६-०७ मध्ये १,६५,८१० नग व २००८-०९ मध्ये ३८१९५ नग बंदूकीच्या गोळया देण्यात आल्या आहेत. त्यामुळे २००५ मध्ये दिलेल्या ४५,००० गोळयानंतर कधीही एके-४७ च्या गोळया मिळाल्या नाहीत हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे.<br>शासन आता शस्त्रास्त्र धोरण तयार करील व त्यामध्ये पोलीस दलाच्या वेगवेगळया प्रवर्गासाठी व स्तरांसाठी आवश्यक असलेल्या शस्त्रांचा प्रकार नमूद करील .त्यामध्ये विशेष दलासाठी आवश्यक असणारी विभिन्न शस्त्रे आणि तसेच सरावासाठी लागणारा दारुगोळा नमूद करण्यात येईल. तसेच त्यामध्ये, गोळीबाराचे क्षेत्र व शस्त्रागार यांची आवश्यकता व देखभाल यांचाही निर्देश असेल.<br>शासनाने आधुनिकीकरण व शस्त्रास्त्रे यासंबंधातील सर्व सामग्री खरेदीवर संनियंत्रण करण्याकरीता उप मुख्यमंत्र्यांच्या नियंत्रणाखाली एक मंत्रिमंडळ उप समिती गठीत केली आहे.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |

| | | |
|---|---|---|
| | राजकीय पातळीवरुन देखील संनियंत्रण केले जावे आणि त्यामधील अडथळे दूर करण्यात यावेत. | |
| (११) | शासनाने व्यापक हिताच्या दृष्टीने घेतलेल्या कोणत्याही निर्णयात, कोणत्याही अधिकाऱ्याने मग तो कितीही उच्च पदावरचा असो आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडी किंवा प्राथम्ये यांच्यानुसार कोणताही बदल करता कामा नये, यावर शासनाने आग्रही रहावे.<br>समितीला असे आढळून आले की, दहशतवादविरोधी पथकावरील दुहेरी नियंत्रणामुळे त्याचे कामकाज सुरळीतपणे होत नव्हते.<br>दहशतवादविरोधी पथकाचे काम अशा रीतीने हाताळले गेले पाहिजे की, ज्यायोगे मुंबई पोलिसांचे आजचे सामर्थ्य आहे ते कमी होता कामा नये.<br>समितीचे असे मत आहे की, मुंबई बाहेरील गरजा पूर्ण करण्यासाठी अशी पथके तयार करून त्यांना शहर मुख्यालयांत पोलीस आयुक्तांकडे ठेवले पाहिजे. त्या पथकांचे समादेश आणि नियंत्रण रचना पोलीस महासंचालक यांचेकडून करण्यात येईल. या पथकांना शोभेच्या बाहुल्यांप्रमाणे न वागवता त्यांना कायम शस्त्रसज्ज ठेवणे, प्रशिक्षण देणे आणि आणीबाणीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी त्यांना सदैव तत्पर ठेवणे हे महत्वाचे आहे. त्यापेक्षा अधिक महत्वाचे हे आहे की, अशा विशेष पथकाचे तुकडे पाडून काही अधिकाऱ्यांच्या लहरीप्रमाणे त्यांना इकडे तिकडे तैनात करण्यात येऊ नये. २६/११ च्या प्रसंगाचा हा एक महत्वाचा धडा आहे. | शासनाने व्यापक हिताच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयात कोणत्याही अधिका-यांनी त्यांच्या स्तरावर बदल करता कामा नये या मताशी शासन पूर्णपणे सहमत आहे.<br>पोलीस महासंचालक (विशेष कृती) हे पद अलीकडेच निर्माण करण्यात आले असून, पोलीस महासंचालकांच्या दर्जाच्या या अधिका-यांकडे विशेष कारवाई तसेच दहशतवादी विरोधी पथकांचा संपूर्ण कार्यभार राहील. त्यामुळे दुहेरी नियंत्रणाचा प्रश्न राहणार नाही .<br>या शिवाय राष्ट्रीय सुरक्षा गटाच्या धर्तीवर दहशतवादीविरोधी विशेष कारवाई हाती घेण्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व शास्त्रास्त्रे असलेले फोर्स-वन स्थापन करण्यात आले आहे. शासनाने या दलाच्या रचनेविषयी आणि तसेच समादेशाच्या साखळी विषयी सुस्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या युनिटचे लहान युनिटमध्ये तुकडे करण्याची परवानगी दिली जाणार नाही.<br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |
| (१२) | मुंबई शहरातील तसेच उर्वरित महाराष्ट्रातील साधारणतः सर्व दहशतवादी हल्ल्यांच्या प्रकरणांचा तपास फक्त दहशतवादविरोधी पथकाकडूनच केला जावा याचा शासनाने पुनरूच्चार करावा, यास अपवाद करावयाचा असेल तर तसा विशिष्ट निर्णय शासनस्तरावर परिस्थितीनुरुप घ्यावा. | अशा आशयाचा औपचारीक निर्णय शासकीय पातळीवरुन घेण्यात येईल आणि तसे आदेश काढण्यात येतील |
| (१३) | मुंबईतील संवेदनशील अशा खाजगी क्षेत्र आस्थापनांबरोबर काम करताना, अशा आस्थापनांबरोबर विचारविनिमय केल्यानंतर पोलीस प्राधिकाऱ्यांनी शिफारस | अनुक्रमांक ३ समोर याअगोदर नमूद केल्याप्रमाणे सर्व निश्चीत केलेल्या संवेदनशील व सहजवश आस्थापनांचे सुरक्षाविषयक ऑडिट करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | केलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्याची निश्चित अशी व्यवस्था असणे आवश्यक आहे.<br>२६/११ चा अनुभव लक्षात घेता, समिती शिफारस करते की, विशेषतः जास्त विदेशी ग्राहक असणाऱ्या मुंबईतील हॉटेलांसह मोठ्या खाजगी आस्थापनांनी मुंबई पोलिसांशी विचारविनिमय करून योग्य ती सुरक्षा यंत्रणा उभारली पाहिजे. त्यासाठी अपर पोलीस आयुक्त (संरक्षण शाखा) यांना नोडल अधिकारी म्हणून नेमावे व विभागीय पोलीस यंत्रणेसह पोलीस-खाजगी सुरक्षा यांचा समन्वय साधावा. | आले आहे आणि आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था अंमलात आणली जात आहे.<br>अपर मुख्य सचिव (गृह) आणि पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त यावर संनियंत्रण ठेवतील व नियमित आढावा घेतील. |
| (१४) | सध्या, मुंबई शहर पोलिसांना हॉटेलांसह खाजगी जागांमध्ये बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची माहिती उपलब्ध होत नाही. गरज पडली तर त्यासाठी कायदेशीररीत्या मागणी करावी लागते. या संदर्भात, समितीने असे नमूद केले आहे की, न्युयॉर्क शहर पोलीस व इतर काही पोलीस दले यांना अशा कॅमेऱ्याद्वारे मिळालेली माहिती सहज उपलब्ध होते. तसेच, बहुतांश खाजगी क्षेत्र सुरक्षा कर्मचारीवर्गाला अशी सुरक्षा साधने हाताळण्याचे प्रशिक्षण दिलेले नसते. त्यांना पुरेसे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा भार फक्त शहर पोलिसांवर असल्यामुळे सर्व सार्वजनिक ठिकाणे, मॉल्स, रेल्वे स्टेशन इत्यादीमधील सीसीटीव्हीचे संनियंत्रण करताना मुंबईमध्येसुद्धा या गोष्टींचा वापर करता येईल.<br>या अनुभवावरून असे सूचित होते की, मुंबई शहर पोलीस व मोबाईल फोन सेवा पुरवठादार यांच्या दरम्यान निकटतम संपर्क असण्याची गरज आहे. त्यामुळे, असा कोणताही संपर्क शोधून काढण्यासाठी त्याचा वापर करता येऊ शकतो. तथापि, मुंबई पोलिसांनी, असे संशयास्पद सेल्युलर संदेश शोधून काढण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या संनियंत्रण कार्यक्षमतेत सुधारणा केलीच पाहिजे. | खाजगी पोलीस सुरक्षा कर्मचा-यांना सक्तीचे सुरक्षा साधने हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यासह वर नमूद केल्याप्रमाणे ,अंमलबजावणीसाठी शासनाकडून उपाय योजण्यात येतील. तसेच आपत्ती व्यवस्थापनाकरिता खाजगी संस्थाबरोबर निश्चित अशी संहिता प्रस्थापित करण्यात येईल. खाजगी जागांमध्ये बसविलेल्या CCTV कॅमे-यांमार्फत उपलब्ध माहिती पोलीसांना देण्याबाबत आवश्यक त्या कायदेशीर तरतूदी करण्यात येतील.<br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |
| (१५) | मुंबई शहरात, अधिकारी संवर्गातील तसेच शिपाई आणि हवालदार स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी एक अत्यंत तातडीचा कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. | मुंबईसह संपूर्ण राज्यासाठी एक धडक कृती योजना हाती घेण्यात आली आहे. पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्तापासून तर |

| | | |
|---|---|---|
| | सध्याच्या प्रशिक्षण सुविधा पुरेशा नसल्याने, शासनाने भरती केलेल्या पोलीस जवानांना प्रशिक्षण देण्यासाठी, निवृत्त पोलीस निदेशकांना कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याचा विचार करावा. | महासंचालकांपर्यंतची रिक्त पदे जुलैअखेरपर्यंत भरण्यात येतील तर पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ऑक्टोबर अखेरपर्यंत भरण्यात येतील अशी अपेक्षा आहे. |
| (१६) | अशासकीय क्षेत्रांकरिता कायमस्वरूपी पोलीस टेहळणी गट पुरविणे शक्य नसल्याने, शासनाने राज्यातील खाजगी क्षेत्राच्या सुरक्षाविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या धर्तीवर, राज्य औद्योगिक सुरक्षा दल स्थापन करण्याचा प्रयत्न करावा. गुजरात राज्यात हा प्रयत्न यशस्वी झाला आहे. सध्या, खाजगी आस्थापनांची सुरक्षा अप्रशिक्षित आणि बेभरवशाच्या खाजगी सुरक्षा संघटनांकडून करण्यात येत आहे. प्रस्तावित महाराष्ट्र राज्य औद्योगिक सुरक्षा दलाला पोलीस प्रशिक्षण विद्यालयांमध्ये आणि आवश्यकता भासल्यास, निवृत्त पोलीस निदेशकांच्या मदतीने प्रशिक्षण देण्यात यावे. यामुळे योग्य पूर्वचरित्र असलेल्या स्थानिक युवकांना नोकरीचा एक पर्याय खुला होईल. गुजरातमध्ये, अशा औद्योगिक सुरक्षा दलाची स्थापना एक संस्था म्हणून करण्यात आली आहे. या संस्थेचा अध्यक्ष म्हणून गृह सचिव तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून एक वरिष्ठ पोलीस अधिकारी तिचे काम पाहतात. सध्या त्यांची संख्या २,५०० इतकी असून त्यांना वडोदरा, अहमदाबाद इत्यादी शहरातील गुजरात औद्योगिक विकास महामंडळाच्या विभिन्न ठिकाणी, शिप ब्रेकिंग यार्डासह गुजरात सागरी मंडळाच्या विविध ठिकाणी तसेच खाजगी क्षेत्राच्या काही कार्यालयांमध्येसुद्धा तैनात करण्यात आले आहे. | केंद्रीय औदयोगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) धर्तीवर राज्य औदयोगिक सुरक्षा दल स्थापन करण्याचा निर्णय तत्वत: घेण्यात आला आहे. तसेच आवश्यक त्या कायदेशीर व संघटनात्मक उभारणीचे कामदेखील अंतिम टप्प्यात आले आहे. सदर दल आक्टोबर अखेरपर्यत उभारण्यात येईल. |
| (१७) | सध्या, अनेक खाजगी व्यक्तींनासुद्धा मोठ्या प्रमाणावर पोलीस संरक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडत आहे.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | आजच्या परिस्थितीत एक स्पष्ट धोरण आहे की, गुप्तचर विभाग आणि पोलीस यानां एखाद्या खाजगी व्यक्तीस असलेल्या धोक्याच्या वाटणा-या अनुमानावर आधारावर त्या व्यक्तीला संरक्षण दिले जाते . एखादया विशिष्ट व्यक्तीच्या जीवितास धोका असल्याचे पोलीसांना आपणाहून जाणवले तर त्या व्यक्तीला राज्याकडून सुरक्षा पुरविण्यात येते आणि त्यासाठी कोणताही आकार वसूल केला जात नाही. एखादया खाजगी व्यक्तीने सुरक्षा पुरविण्याची विनंती केली असेल तेंव्हा ती दिली जाते |

| | | |
|---|---|---|
| | | ,मात्र त्या प्रयोजनासाठी उपलब्ध केलेल्या मनुष्यबळावर आधारीत असा आकार वसूल केला जातो. शासकीय समितीकडून वेळोवेळी सुरक्षाविषयक आवश्यकतांचा आढावा घेण्यात येतो आणि त्यासंबंधातील अंतिम निर्णय शासनाकडून घेण्यात येतो . |
| (१८) | भेटीदरम्यान आम्हाला नियंत्रण कक्षाच्या कामाची जागा आणि स्थिती समाधानकारक नसल्याचे आढळून आले. नियंत्रण कक्षाला आपत्ती व्यवस्थापनाचे केंद्र म्हणून कार्य पार पाडावे लागत असल्याने, आम्ही अशी शिफारस करतो की, आयुक्तांच्या १५० वर्षे जुन्या कार्यालयाच्या अगदी मागे उपलब्ध असलेल्या भूखंडावर अद्ययावत दळणवळण आणि इतर अत्याधुनिक सामग्रीने सज्ज अशी एक अद्ययावत इमारत उभारण्यात यावी. या गोष्टीस अत्युच्च प्राधान्य देण्यात यावे. | नियंत्रण कक्ष अगोदरच उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. स्फोटरोधक आणि अग्निरोधक बांधकाम करुन त्याचे मजबुतीकरण करण्याबाबतच्या प्रस्तावाची अंमलबजावणी या वर्षी करण्यात येईल. |
| (१९) | पोलीस व्यवस्थापनाचे स्वरूप पालटण्यासाठी तीन दशकांपेक्षा अधिक काळापूर्वी राष्ट्रीय पोलीस आयोगाने अनेक शिफारशी केल्या होत्या आणि सर्वोच्च न्यायालयानेही त्यांना पुष्टी दिली होती. आता त्या दिशेने प्राथम्यानेपाऊले उचलण्याची गरज आहे.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | मा सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख शिफारशीची आणि निर्देशांची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.<br>१) **राज्य सुरक्षा आयोग** :- स्थापना झाली आहे.<br>२) **पोलीस महा संचालक यांची निवड आणि किमान पदावधी** :- सूचविण्यात आलेल्या निवडप्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आहे. भारत सरकारचा अ.भा.से. अधिनियम आणि नियम यांच्या संबधीत तरतूदींमध्ये सुधारणा करण्याच्या अधीन राहून पोलीस महासंचालकाचा निश्चित पदावधी स्वीकारण्यात आला आहे.<br>३) **पोलीस महानिरीक्षक आणि इतर अधिकारी यांचा किमान पदावधी** - बदल्यांबाबतच्या राज्याच्या कायद्यांच्या तरतुदी लागू आहेत आणि एस एच ओ आणि त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यास दोन वर्षे कालावधी दिला जातो.<br>४) **अन्वेषणाचे विकेंद्रीकरण करणे** - जिल्हे ,शहरे आणि मोठी नगरे यांमध्ये असे विकेंद्रीकरण अगोदरच आस्तित्वात आहे आणि ते क्रमशः छोटया शहरांमध्येही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | ५) **<u>पोलीस आस्थापना मंडळाची</u>** स्थापना करण्यात आली असून बदल्या हया मंडळाद्वारे ,महासंचालक स्तरावर करण्यात येतात .स्थानिक पोलीस आस्थापना मंडळाची स्थापना करण्यासाठी सर्व क्षेत्रीय युनिटांना सूचना दिलेल्या आहेत. पोलीस आस्थापना मंडळ आता कार्यरत आहे. |
| (२०) | मुंबई पोलिस यंत्रणेने अल्पावधीत पाचही ठिकाणच्या घटनांना तोंड दिले आणि वेगाने व तत्परतेने काम केले ते निश्चितच गौरवास्पद आहे. दहशतवाद्यांना तोंड देणाऱ्या पोलीस चमूचे नेतृत्व करणाऱ्या युवा अधिकाऱ्यांनी जे धैर्य आणि धाडस दाखविले तेही कौतुकास्पद आहे. | अनेक अडचणी असूनसुध्दा दहशतवाद्यांशी अतुलनीय धैर्याने लढलेल्या मुंबई पोलीसांच्या शीघ्र प्रतिसादाबददल व लढाऊ बाण्याबददल समितीने गौरवोद्‌गार काढले आहेत .<br>शासन सर्व संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्गाला समितीने त्यांचा गौरव केला असल्याबाबत कळवील. |
| (२१) | समितीला असे वाटते की अशा आपात्कालीन परिस्थितीत, पोलीस आयुक्त यांनी नियंत्रण कक्ष समादेशन केंद्राचा ताबा स्वत:कडे घेणे आवश्यक होते. त्यामुळे वेगवेगळया पोलीस युनिटांकडून होणाऱ्या प्रयत्नांची पुनरावृत्ती कदाचित टाळता आली असती.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | विभिन्न पोलीस युनिटांनी केलेल्या प्रयत्नाच्या पुनरावृत्तीबाबतचा कोणताही स्पष्ट उल्लेख अहवालात दिलेला नाही. पोलीस आयुक्तांचे लेखी अभिप्राय रेकॉर्डवर घेण्यात आलेले नाहीत. तसेच, आयुक्तांनी जेथे क्षेत्रीय नियंत्रण कक्ष उभारले होते त्या नियंत्रण कक्षात ते थांबलेले होते, आणि शेवटपर्यत ते वेगवेगळया युनिटांच्या संपर्कात राहून मुंबईतील घटनांचे सनियंत्रण करीत होते. परिच्छेद क्रमांक २ मध्ये समितीने नमुद केल्याप्रमाणे प्रमाणित कार्यचलन पध्दतीनुसार सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था ) हे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे प्रमुख असतील त्या जागी सह पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा श्री. राकेश मारीया यांनी केलेल्या कामाचे देखील समितीने कौतुक केले आहे. |
| (२२) | सद्याच्या व्यवस्थेमुळे, मंत्रालयातील वरिष्ठतम अधिकाऱ्यांना गुप्तवार्तेसंबंधात माहिती मिळत नसेल तर धक्कादायक बाबच म्हणावी लागेल. गृह विभागाला मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये, राज्यभर पोलीस दलाचे नियंत्रण करणे अनिवार्य असून, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ४ लक्षात घेता, कामकाजाची ही पध्दत इष्ट नाही. अपर मुख्य सचिव, गृह किंवा सचिव, कायदा व सुव्यवस्था, गृह (जे सर्वसामान्यपणे वरिष्ठ भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी | हे मत स्वीकारता येत नाही कारण,गुप्तवार्ता आयुक्तांकडून नियमीतपणे अपर मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांना दर आठवडयाला गुप्तवार्ताविषयक बाबी अवगत करुन देण्यात येतात आणि पोलीस महासंचालक ,पोलीस आयुक्त आणि सर्व क्षेत्रीय अधिकारी यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी लेखी सूचना/माहिती पाठविण्यात येते .<br>मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ६ तसेच कलम २४ |

| | | |
|---|---|---|
| | असतात) अशी पदे धारण करणारे अधिकारी यांनी, केवळ कागदपत्र हाताळण्याचे सचिवीय काम न करता मुंबई शहरातच नव्हे तर महाराष्ट्रातील अन्य संवेदनशील नागरी / ग्रामीण भागांमधील सुरक्षा व्यवस्थेकडे आणि प्रत्यक्ष कारवाई करणाऱ्या पोलिसांच्या गरजांकडे सतत लक्ष ठेवले पाहिजे, इतकेच नव्हे तर त्यामध्ये सक्रिय राहिले पाहिजे. | याअन्वये पोलीस महासंचालकांकडून गुन्हयांशी व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधीत अहवाल विवरण मागविणे आवश्यक आहे. म्हणून करण्यात येणारी कार्यवाही ही पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त अधिका-यांनी करावयाची असल्यामुळे या कामाचे संनियंत्रण पोलीस महासंचालक हे करीत असतात तरीही २६/११ नंतर गृह मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली गुप्तवार्ताविषयक साप्ताहिक बैठक बोलवण्याची पध्दत सुरु करण्यात आली आहे. |
| (२३) | केंद्रीय गुप्तवार्ता अभिकरणांनी दिलेल्या संदेशावर कृती करण्यामध्ये कोणताही हलगर्जीपणा केल्याचे आम्हाला आढळून आले नाही. | --- |
| (२४) | हा युध्दसदृश्य हल्ला मुंबई पोलीसांच्याच नव्हे तर इतर कोणत्याही पोलीस यंत्रणेच्या आवाक्याबाहेरचा होता.हा हल्ला राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांसारख्या विशेष दलांकडून हाताळला जाणे आवश्यक होते. | --- |
| (२५) | तथापि, हा बहुलक्ष्यी हल्ला हाताळण्यामध्ये पोलीस आयुक्त, मुंबई यांनी पुरेसा पुढाकार घेतला नाही असे आम्हाला आढळून आले. संपूर्ण कारवाईच्या दरम्यान ते ट्रायडन्ट हॉटेलनजिकच्या एकाच जागी थांबून राहिले होते. पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयातील एकत्रित व दृश्य नियंत्रणाचा अभाव राहिल्यामुळे जनतेत पोलीसांनी हे प्रकरण अकार्यक्षमतेने हाताळले असा समज निर्माण झाला. बऱ्याच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी आम्हांस असे सांगितले की, पोलीस आयुक्तांनी मार्गदर्शन केले नाही किंवा चालू कार्यवाहीबद्दल चौकशी केली नाही. पोलीस आयुक्तानी जरी काही निवडक ठिकाणी बिनतारी व भ्रमणध्वनी यंत्राने संपर्क साधला असला तरी, आपण एका गटाचे सदस्य आहोत अशी भावना अनेक अधिकाऱ्यांच्या मनात निर्माण झाली नाही.<br>श्री.हसन गफूर, पोलीस आयुक्त यांच्याकडे दृश्य व प्रत्यक्ष नेतृत्वाचा अभाव होता या निष्कर्षाप्रत आम्ही आलो आहोत. | समितीचे हे मत स्वीकारता येत नाही. कारण, परिच्छेद ४ आणि परिच्छेद ५.१ मध्ये स्पष्टपणे दर्शविले आहे की, मुंबई पोलीसांनी आपली कर्तव्ये अतिशय चांगल्या रीतीने बजावली आहेत तेव्हा त्याच दलाचा प्रमुख कसा काय अपयशी असू शकतो, हे स्पष्ट होत नाही याबाबत परिच्छे २२ मधील अभिप्राय पुरेसे बोलके आहेत.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur |
| (२६) | दहशतवादी कृत्यांचा सामाना करण्यासाठी पूर्वी अनेक साधने तयार करण्यात आली होती. परंतु,काळाच्या ओघात ती एकतर कमकुवत बनली आहेत किवा | पोलीस आधुनिकीकरण कार्यक्रमाद्वारे शस्त्रांच्या गरजेवर भर दिला जातो. फोर्स-वन स्थापन करुन आणि पोलीस महासंचालक, (विशेष कृती) हे पद |

| | | |
|---|---|---|
| | त्यांचे महत्व नष्ट झाले आहे असे आम्हाला आढळून आले आहे. आज आपल्याला असणारे धोके अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. आणि दहशतवादी कृत्यांवरुन हे देखील स्पष्ट झाले आहे की ,आता आपल्याला लवकरात लवकर अधिक कार्यक्षम व सुसज्ज साधनांची गरज आहे. | निर्माण करुन संरचनात्मक बदल करण्याचे काम सुरु झाले आहे. धोक्याचे गांभीर्य घेवून गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली प्रमाणित कार्यचालन पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. |
| (२७) | मुंबईने ज्याचा सामना केला तशा प्रकारच्या हल्ल्याला तोंड देण्याच्या दृष्ट्रीने व महाराष्ट्राच्या इतर प्रमुख शहरांचे पोलीस दल कितपत सुसज्ज आहे यांची तज्ञामार्फत तपासणी करुन आवश्यक ती पावले उचलावीत. मुंबई, ठाणे अणि नवीमुंबई येथील पोलीसांची एकात्मीकृत कृती योजना असावी याबाबीकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. या प्रश्नाचा तीन आयुक्तालयांच्या प्रशासनिक सीमांच्या पुरता मर्यादित विचार करु नये. शिवाय, महाराष्ट्र पोलीस महासंचालकांच्या मुंबई शहरात कामकाज करण्याबाबतच्या अधिकाराच्या प्रशासनिक मर्यादा त्यांच्या कृतीच्या आड येता कामा नये.<br><br>Under Secretary<br>Maharashtra Legislature Secretariat<br>Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur | इतर प्रमुख शहरांमध्ये दहशदवादी हल्ल्यांना सामोरे जाताना पोलीस प्रशासनाच्या सिध्दतेबाबतचा आढावा घेण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात येईल.<br>पोलीस महासंचालकांसाठी संपूर्ण राज्यामध्ये कोणतीही प्रशासनिक मर्यादा नाही. मुंबई पोलीस अधिनियमात असे स्पष्ट नमूद आहे की, प्रशासकीय सीमा हया, केवळ दैनंदीन कामकाजाच्या आणि पोलीस दलाच्या प्रशासनासाठी आहेत (कलम २३).<br>कलम (३) हे स्पष्टपणे नमूद करते की, संपूर्ण महाराष्ट्राकरिता एक पोलीस दल असेल.<br>कलम (६) आणि तसेच कलम (७) (क) आणि (ग) यांत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, आयुक्त हे, महासंचालकांच्या नियंत्रणाच्या अधीन,त्यांची कर्तव्ये पार पाडतील.<br>अधिनियमाच्या या कलमात सुधारणा केलेली नाही आणि मुंबई शहरात अधिकार वापरण्याबाबत पोलीस महासंचालकांच्या अधिकारावरील मर्यादेचा प्रश्न उदभवत नाही. अपर महासंचालकांचा दर्जा असलेल्या मुंबई पोलीस आयुक्तापेक्षा पोलीस महासंचालक केवळ वरिष्ठच नाहीत तर ते राज्य पोलीस दलाचे प्रमुखही आहेत.तसेच,ते राज्यातील संपूर्ण कायदा व सुव्यवस्थेस आणि सुरक्षिततेसही जबाबदार आहेत. |

जोडपत्र १

# सन २००४-०५ ते २००८-०९ मध्ये योजनेत्तर तरतुदीतून खरेदी केलेला अश्रुधूर व दारुगोळा

| (रुपये हजारात) | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००४-०५ | | २००५-०६ | | २००६-०७ | | २००७-०८ | | २००८-०९ | | अतिरिक्त ०८-०९ | | | |
| बाब | नग | रक्कम | नग | रक्कम | नग | रक्कम | नग | रक्कम | नग | रक्कम | नग | रक्कम | एकूण नग | एकुण रक्कम |
| अश्रुधूर | ८१८९ | ४५९४ | ७४०० | ४४३४ | ६००० | ३१२९ | ५००० | ३२०४ | ५००० | ३७११ | | | ३१५८९ | १९०७२ |
| गॅस गन | | | | | | | १० | १९८ | ५ | ६० | | | १५ | २५८ |
| एमबीएल अग्नी वर्षाव | | | | | | | २ | ० | | | | | २ | ० |
| ५.५६ इन्सास रायफल | १०० | २५१७ | १०० | २५१७ | | | ४८५१११ | ३३९३ | | | | | ४८५३११ | ८४२७ |
| ५.५६ डीपी रायफल | | | | | ५६ | १०८७ | | | | | | | ५६ | १०८७ |
| ७.६२ एसएलआर रायफल मॅगेझीन | | | २०० | ५७७० | | | | | | | | | २०० | ५७७० |
| ३०३ बॉल दारुगोळा | ३६५००० | ९४९० | ३००००० | ७८०० | २२५००० | ६०८४ | १८८६४८ | ६८८१ | | | | | १०७८६४८ | ३०२५५ |
| ७.६२ एसएलआर बॉल दारुगोळा | ३२५००० | ५०७० | ३००००० | ४६८० | ३८१००० | ६७९८ | ३४५८९३ | ८८७४ | | | | | १३५१८९३ | २५४२२ |
| ७.६२ गन मशीनकरिता बॉल दारुगोळा | | | | | | | | | | | | | ० | ० |
| ३८० बॉल दारुगोळा | २४९१०० | ३६९३ | | | १००००० | ११६६४ | २३६०० | ३३९३ | ५२७५० | १००० | | | ४२५४५० | १९७५० |
| एके ४७ बॉल दारुगोळा | १००००० | २११८ | १००००० | ४६०७ | १६५८१० | | | | ३८१९५ | १००० | | | ४०४००५ | ७७२५ |
| ९ एमएम बॉल दारुगोळा | २१६००० | २५१६ | १३३००० | | २६९२०० | | ४४३३४ | २४८३ | ३०२५२० | ५१६७ | १३३००० | २६९७३ | १०९८०५४ | ३७१३९ |
| ५.५६ इन्सास बॉल दारुगोळा | | | ५०००० | | २२८२०० | | | | | | | | २७८२०० | ० |
| ५.५६ एम एम ड्रील कार्ट्रेज | | | | | ५२१ | ३० | | | | | | | ५२१ | ३० |
| ५.५६ एमएम बॉल दारुगोळा | | | | | | | | | ३८२०० | ४९९ | १६८००० | | २०६२०० | ४९९ |
| ७.६२ एमएम एसटी बेल्ट दारुगोळा | | | | | | | | | | | | | ० | ० |
| ३०३ बीडीआर दारुगोळा | | | | | | | | | | | | | ० | ० |
| १२ बोअर पंप ॲक्शन गन | | | | | | | | | ५० | १५७४ | | | ५० | १५७४ |
| रबर बुलेटस् | | | | | | | | | ५०० | | | | ५०० | ० |
| ७.६२ एमएम सीटीएन | | | | | | | | | | | १३५०००० | | १३५०००० | ० |
| ७.६२ एमएम प्लास्टीक बुलेट | | | | | | | | | ३१०००० | ६९९३ | | | ३१०००० | ६९९३ |
| ७.६२ एमएम बॉल दारुगोळा | | | | | | | | | ४७८००० | ९९९१ | | | ४७८००० | ९९९१ |
| एसए ३८०एमएम बॉल | | | | | | | | | | | २२२००० | | २२२००० | ० |
| ७.६२ बॉल ए ७ | | | | | | | | | | | ८१४५००० | २६४२२ | ८१४५००० | २६४२२ |
| ७.६२ एमएम बॉल एम-८० बीडीआर | | | | | | | | | | | ८०९००० | १६६५४ | ८०९००० | १६६५४ |
| एकूण | | २९९९८ | | २९८०८ | | २८७९२ | | २८४२६ | | २९९९५ | | ७००४९ | १६६७४६९४ | २१७०६८ |



Under Secretary
Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur